# पुस्तिका क्र. 1

## प्रस्तावना

**आमच्याविषयी**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**थोडक्यात परिचय**

मुंबई शहर हे 437.71 चौ.कि.मी. वर वसलेले 1,24,42,373 लोकसंख्या असलेले विस्तृत आरोग्य सेवा पुरविणारे देशातील एक मोठे महानगर आहे जेथे 53 टक्के जनता किमान मूलभूत सोयीसह गलीच्छ वस्तीमध्ये रहाते. प्रतिबंधात्मक व उपचारात्मक विशेष तसेच उच्चत्तम विशेष सेवांमध्ये संसर्गजन्य रोग प्रतिबंधासाठीचा 466 करोड रु. प्रती वार्षिक खर्चाचा हयामध्ये समावेश आहे.

हया आरोग्य सेवा 18 उपनगरीय रुग्णालये, 5 विशेष रुग्णालये, (नाक, कान, घसा रुग्णालय, नेत्र रुग्णालय, क्षयरोग रुग्णालय, कुष्ठरोग रुग्णालय व साथींच्या रोगांसाठीचे कस्तुरबा रुग्णालय) तसेच 28 प्रसुतिगृहे, 169 दवाखाने, 183 आरोग्य केंद्रे, (हयातील ६१ आरोग्य केंद्र ज्या दवाखाण्याला जोडून आहेत त्यांना प्रयोगाळाशाळीची सुविधा राष्टीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध करण्यात आली आहे.), २१ शहरी प्राथिमक आरोग्य केंद्र जानेवारी २०१६ पासून कार्यरत आहे. 23 प्रसुतिपश्चात केंद्रे, लैगिंक संसर्ग रोग चिकित्सालय तसेच व्यवसनमुक्ती केंद्र इत्यादीद्वारे पुरविण्यात येतात.

सार्वजनिक आरोग्य खात्यात आरोग्यसेवांमध्ये प्रतिबंधात्मक धोरणावर विशेष जोर दिला जातो. उदा. मलेरिया, क्षयरोग, कुष्ठरोग, लैंगिक संसंर्गजन्य रोग, एच.आय. व्ही., एडस तसेच पोलिओ निमूर्लन, रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिम, कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन, ( शालेय विद्यार्थ्याची आरोग्य विषयक काळजी ) शालेय आरोग्य विभाग, जैविक कच-याची विल्हेवाट.

वर नमूद केलेल्या रोगांच्या प्रतिबंधात्क यशस्वी अथक प्रयत्नांनंतर सुध्दा काही नविन

आव्हाने तसेच काही अडचणी निर्माण होतच असतात. कारण महानगरीय जीवनपध्दती व खेडयातून सतत लोकांचे या शहरात स्थलांतर तसेच वाढती लोकसंख्या लोकसंख्येची घनता (9800 Sq. Km. च्या वर ) रोज रस्त्यावर धावणारी 400,000 वाहने, 50 टक्के लोकांचा विविध कारणास्तव विस्तृत प्रमाणावर प्रवास, गलीच्छ वस्त्यांची वाढ आणि अनारोग्य परिस्थिती, अपु-या नागरी सुविधा, प्रदुषणामुळे असलेले विविध प्रकारचे रोग, विविध प्रकारचे कर्करोग आणि तणावामुळे होणारे रोग याविषयी आरोग्य खात्याला पूर्वयोजना तयार कराव्या लागतात.

कर्तव्ये आणि खात्याचे कार्यक्रम.

कार्यकारी आरोग्य अधिकारी, सह कार्यकारी आरोग्य अधिकारी, उपकार्यकारी आरोग्य अधिकारी,13 सहाय्यक आरोग्य अधिकारी ( यातील काही राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत तसेच विभागीय आरोग्य प्रशासनांतर्गत कार्यरत ) व सहाय्यक आरोग्य अधिकारी ( शाळा ) , व विशेष अधिकारी ( कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन ) , प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, वरिष्ठ वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिक्षक प्रमुख वैद्यकीय अधिकारी ( रुग्णालये ), प्रमुख वैद्यकीय अधिकारी, विशेष रुग्णालये यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली खालील कार्यक्रम राबविले जातात.

आरोग्य खात्याची कर्तव्ये व कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत.

1. जन्म मृत्यु आणि आढळून आलेल्या रोगांची सांख्यीकी आकडेवारी ठेवणे
2. संसर्गजन्य रोगांवर प्रतिबंध व नियंत्रण
3. मृताच्या विल्हेवाटीसाठी जागा नियमित करणे व उपलब्ध करुन देणे.
4. मृतदेह विल्हेवाटीसाठी मुंबई शहराबाहेर पाठविणे किंवा आणणे यासंदर्भात कार्यकारी आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि कार्यालयीन वेळेनंतर वरिष्ठ वैद्यकीय अधिक्षक कस्तुरबा रुग्णालय, वैद्यकीय अधिक्षक ( 18 उपनगरीय रुग्णालये ) येथून परवानगी देण्यात येते.
5. विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविणे ( क्षयरोग, हिवताप, निमूर्लन, कुष्ठरोग, लसीकरण,

कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन , शालेय आरोग्य, अंधत्व निमूर्लन, एडस इत्यादी.

6. प्रसुति पश्चात केंद्रे, आरोग्य केंद्रे, बाहय रुग्ण सेवा, रुग्णालये, दवाखाने, चिकित्सालये यासह प्रसुति व बाल कल्याण सेवा.

7. चलत उपचार केंद्राद्वारे व दवाखान्याद्वारे वैद्यकीय सुविधा.

8. अप्रमाणित खाद्यपदार्थ विषयक आणि अन्नभेसळ प्रतिबंधक

9. मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 394 आणि 412 अन्वये आणि महाराष्ट्र अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम 1962 नुसार खाद्यपदार्थ व्यवसायांना परवाने देणे व नियंत्रण ठेवणे.

10. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने (खाद्यपदार्थव्यतिरिकत) काही व्यवसायांना परवाने देणे व नियंत्रण ठेवणे.

11. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून चित्रपटगृहे, नाटयगृहे, जत्रा व उत्सव इत्यादीवर नियंत्रण

12. शुश्रुषालयांना परवाना, नोंदणी नियत्रंण

13. परिचारिका आस्थापनांना परवाने देणे.

14. इतर संकीर्ण कार्ये ( ल्युनेटीक ) वेडयाची प्रकरणे, लैगिंक संसर्ग रोग नियंत्रण, दवाखाने आणि प्रयोगशाळा, जीवरक्षक सेवा( विविध समूद्र किनारे ), भटकी गुरे पकडणे, कोंडवाडयात टाकणे, भटके कुत्रे पकडणे.

15. किटक नियंत्रण - हत्तीरोग नियंत्रण

16. विशेष रुग्णालये उदा. साथीच्या रोगासाठी कस्तुरबा रुग्णालय, क्षयरोग रुग्णालय समूह आणि क्षयरोग चिकित्सालये, अक्वर्थ कुष्ठरोग रुग्णालय, नेत्र रुग्णालय, नाक, कान घसा रुग्णालय

17. दर 10 वर्षानी जनगणना.

18. दादर येथे जी/उत्तर विभागातील महापालिका प्रयोगशाळेत पाण्याच्या नमुन्याचे आणि

खाद्यपदार्थाच्या नमुन्याचे पृथ्थ्करण करण्यात येते.

19. प्रसूतिपूर्व गर्भ निदान तंत्र, जैविक वैद्यकीय कचरा

वरील सर्व कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी मुंबई महापालिकेचे, 24 विभाग कार्यालयात विभाजन केले असून हया सर्व विभागाचे 6 परिमंडळामध्ये, प्रत्येक परिमंडळास 1 उपकार्यकारी आरोग्य अधिकारी आणि एक सहाय्यक आरोग्य अधिकारी याप्रमाणे अधिकार श्रेणीनुसार गट पाडण्यात आले आहेत.

एकूण 24 विभाग कार्यालये आहेत. प्रत्येक विभागाचे विभाग प्रमुख म्हणून असलेले वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे, जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम 1969 व नियमावली 2000 अन्वये उप निबंधक आहेत. प्रत्येक परिमंडळाच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी काम पहातात. त्यांच्या विभागाच्या सहाय्यक महापालिका आयुक्तांना ते उत्तरदायी असतात. विभाग पातळीवर सहाय्यक महापालिका आयुक्त हे कर्मचारीवृंदावर पर्यवेक्षण करतात. आस्थापनीय कर्मचारी, दवाखाने, स्मशानभूमी इ.साठीची तरतूद वैद्यकीय आरोग्य अधिका-यांकडून प्रस्तावित केली जाते. सदर माहिती कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयाकडून एकत्रित करण्यात येते व अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप करण्यात येते.

सही/-

कार्यकारी आरोग्य अधिकारी
सार्वजनिक आरोग्य खाते